जा.क्र. - न्याय/ 2408/२०२४.
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय,
२ रा मजला, सास्मिरा इमारत,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दिनांक - १०-०५-२०२४.

## परिपत्रक क्र. ६०८ दिनांक - १०-०५-२०२४.

**संदर्भ :** १. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. ३२९६/२०२० सोबत दिवाणी अर्ज क्र. १३६५/२०२० व १३६६/२०२० मध्ये दि. २७-०४-२०२२ रोजी दिलेले निर्देश.

२. धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जारी केलेले परिपत्रक क्र. ५९४/२०२२, दिनांक -१७-०६-२०२२.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-२२ हे 'बदल अर्ज' (Change Report) बाबत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था दुरुस्ती अधिनियम क्रमांक ५५/२०१७ अन्वये सदर कलम-२२ मध्ये, बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याची (Provisional Acceptance) तरतुद करण्यात आली. या तरतुदीची अंमलबजावणी करणेकरीता धर्मादाय आयुक्तांनी एखादे परिपत्रक जारी करण्याचा विचार करावा, असे निर्देश मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी उपरोक्त संदर्भ क्र. १ येथे नमुद रिट याचिकेमध्ये दिले आहेत. सदर निर्देशांनुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयातर्फे उपरोक्त संदर्भ क्र. २ येथे नमुद परिपत्रक जारी करण्यात आले. परंतु, कलम-२२ मधील बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याच्या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी होत नसुन या संदर्भात काही अधिक सुचना जारी करणे आवश्यक असल्याचे अनुभवास आले आहे. करीता, कलम-२२ मधील बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याच्या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भांकित अ.क्र. २ वरील परिपत्रक अधिक्रमित (Supersede) करण्यात येत असून खालीलप्रमाणे सुचना जारी करण्यात येत आहेत -

**सुचना :**

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बदल अर्ज (Change Report) तात्पुरता स्विकारावा (Provisional Acceptance) अशी विनंती करणारा एक वेगळा अर्ज पक्षकारांना बदल अर्ज दाखल करतेवेळी किंवा प्रलंबित असलेल्या बदल अर्ज प्रकरणात सादर करता येईल.

10/05/2024.

२. बदल अर्ज तात्पुरता स्विकारावा असा वेगळा अर्ज पक्षकारांनी नव्याने दाखल करावयाच्या किंवा प्रलंबित प्रकरणांत सादर केल्यास त्याला किरकोळ अर्ज म्हणुन स्वतंत्रपणे नोंदवावे. तथापी, असा स्वतंत्र नोंदविलेला किरकोळ अर्ज मुळ बदल अर्जासोबतच जोडण्यात (Tag करण्यात) यावा.

३. बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याच्या स्वतंत्रपणे नोंदविलेल्या किरकोळ अर्जावर धर्मादाय उप आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी सदर कलम-२२ मध्ये नमुद कालावधीत आदेश पारीत करावेत. परंतु, असे आदेश पारीत करणेकरीता काही कागदपत्रांची पूर्तता होणे आवश्यक आहे, असे धर्मादाय उप आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे मत असल्यास पक्षकारांना सदर पूर्तता करण्याची संधी देण्यात यावी. येणेप्रमाणे पूर्तता झाल्यानंतर सदर कलम-२२ मध्ये नमुद कालावधीत बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याच्या किरकोळ अर्जावर आदेश पारीत करावेत.

४. बदल अर्ज तात्पुरता स्विकारण्याच्या किरकोळ अर्जावर धर्मादाय उप आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी पारीत केलेल्या आदेशास आव्हान देणारे प्रकरण पक्षकाराने दाखल केल्यास, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी, आनंद शेषराव भरोसे विरुध्द राहुल वेदप्रकाश पाटील व इतर, रिट याचिका क्र. ३७८८/२०२१ मध्ये दि. १८-११-२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार असे प्रकरण महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-७०अ नुसार पुनर्निरीक्षण अर्ज (Revision Application) म्हणुन नोंदवावे.

मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी उपरोक्त संदर्भांकित अ.क्र. १ मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार, आणि महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-३ नुसार धर्मादाय आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करुन सदरचे परिपत्रक जारी करण्यात येत आहे. सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने लागू होईल.

10/05/2024.
(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

१. कार्यालयीन आदेश धारिणी.
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त.
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त.
४. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त.
५. संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी).